**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत**
**<u>विखुरलेल्या स्वरुपात उंच रोपांची लागवड करणेबाबत.</u>**
**तांत्रिक व आर्थिक मापदंड, मार्गदर्शक सूचना देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

शासन निर्णय क्र. मग्रारो-२०१०/प्र.क्र. ११४/रोहयो-१
नियोजन विभाग (रोहयो प्रभाग)
मंत्रालय,मुंबई- ४०० ०३२
दिनांक : २२ फेब्रुवारी, २०११.

वाचा : १) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा, २००५
२) शासन निर्णय, नियोजन विभाग क्र.रोहयो -२००५/प्र.क्र.१९४/रोहयो-१०
दिनांक २३ डिसेंबर, २००५
३) महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम (सुधारित) कायदा, २००६
४) शासन निर्णय क्र. मग्रारो-२०१०/प्र.क्र.३५/रोहयो-१ दि. ९ डिसेंबर, २०१०

<u>प्रस्तावना :-</u> महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अधिनियम, २००५ अंतर्गत राज्यामध्ये मग्रारोहयो टप्याटप्याने सुरु करण्यात आली असून दिनांक १ एप्रिल, २००८ पासून संपूर्ण राज्यामध्ये कार्यान्वित करण्यात आली आहे. त्यानुसार संदर्भीय क्र. २ मधील शासन निर्णय दिनांक २३ डिसेंबर, २००५ मधील अनुज्ञेय कामात रोपवाटिका व वृक्ष लागवड इत्यादींचा समावेश आहे. संदर्भीय क्र.१मधील केंद्र शासनाच्या कायद्यातील शेड्युल-१ मध्ये अनुज्ञेय कामात वनीकरण व झाडे लावणे (Afforestation and tree planting) यांना प्राथमिकता दिलेली आहे.

२. महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम (सुधारित) कायद्याच्या कलम ६-१ ब (५) नुसार { (म्हा- महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा २००५ मधील कलम १६ (५) नुसार} तालुक्यात घेण्यात येणा-या एकूण कामांपैकी कमीत कमी ५०% कामांची अंमलबजावणी ग्रामपंचायतद्वारे करणे बंधनकारक आहे.

३. वैश्विक तापमानवाढ आणि पर्यावरणाचा समतोल राहण्यासाठी, ग्रामीण भागांना हरीत करणे तसेच ग्रामीण भागातील नागरिकांची, लोकांची लाकूडफाटा, इंधन, फळांची, औषधी वनस्पती व गुरांच्या चा-यांची गरज भागविण्यासाठी व ग्रामीण भागातील लोकांना रोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी रोपवाटीका तयार करणे व वृक्ष लागवड करणे ही अत्यंत प्रभावी उपाययोजना आहे.

४. ग्रामविकास विभागाने सर्व जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्राम पंचायत यांनी महाराष्ट्र हरित करण्यासाठी मोठया प्रमाणात झाडे लावण्याचा कार्यक्रम राबविण्याबाबतच्या सूचना दिलेल्या आहेत. त्या अनुषंगाने संचालक, सामाजिक वनीकरण, म.रा. पुणे यांनी रोपवाटिका भाग-१ व २ तसेच वृक्ष लागवडीचे तांत्रिक व आर्थिक मापदंड निश्चित करण्याचा प्रस्ताव शासनास सादर केला. त्यास अनुसरुन उपरोक्त क्र. ४ चा शासन निर्णय, निर्गमित करण्यात आला आहे. सामाजिक वनीकरण महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी विखुरलेल्या स्वरुपात स्वतंत्र झाडांची लागवड करण्यासाठी तांत्रिक व आर्थिक मापदंड निश्चित करण्याचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. त्या अनुषंगाने शासन पुढील निर्णय घेत आहे.

<u>शासन निर्णय :-</u> महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत तसेच महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या तरतुदीनुसार ग्रामीण भागांना हरीत करण्यासाठी गावठाण, शाळेचे प्रांगण,मंदिर परिसर,बाजार परिसर, कार्यालयाजवळ, विहिरींचे जवळ, स्मशानभूमी परिसर व ग्रामपंचायत हद्दीतील इतर उपलब्ध जागेत

विखुरलेल्या स्वरूपात उंच रोपांची लागवड याबाबींच्या तांत्रिक व आर्थिक मापदंडास शासन पुढीलप्रमाणे मान्यता देत आहे. सविस्तर दरपत्रक सोबतच्या परिशिष्ठ-अ सोबत जोडण्यात आले आहेत.

| मुद्दा | रोपांची संख्या | आर्थिक मापदंड | | तांत्रिक मापदंड |
|---|---|---|---|---|
| | | प्रति घटक खर्च रुपये | प्रति रोप खर्च रुपये | |
| महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत गावठाण, शाळेचे प्रांगण, मंदिर परिसर, बाजार परिसर, कार्यालयाजवळ, विहिरीचे जवळ, स्मशान परिसर व ग्रामपंचायत हद्दीतील इतर उपलब्ध जागा, इत्यादी ठिकाणी विखुरलेल्या स्वरुपात उंच रोपांची लागवड. | १०० | ३०,७८७/- | ३०७/- | खड्डयांचा आकार ६०X६०X६० सें.मी. दोन रोपांतील अंतर कमीत कमी ४ मीटर असावे. तसेच १८ महिने वयोमानाची उंच, सुदृढ, वजनदार व निवडक रोपांची लागवड करावी. |

२. या कार्यक्रमांसाठी पुढील उपाययोजना करण्यात याव्यात.

(१) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेमार्फत वृक्ष लागवड, त्याची जोपासना, देखभाल व संरक्षण करण्याची जबाबदारी ग्रामपंचायतची राहील.

(२) सदर आर्थिक मापदंड रुपये १०५/- मजुरीच्या दराच्या आधारे निश्चित केले आहेत. तथापि, मजुरांना मजुरी प्रत्यक्ष कामाच्या मोजमाप प्रमाणेच देण्यात यावी.

(३) हे कार्यक्रम महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कामासाठी निश्चित करण्यात आलेली तरतूद व मापदंडानुसार राबविणे बंधनकारक राहील.

उदा. अ) कार्यक्रमाबद्दल ग्रामसभांनी आवश्यक ठराव करुन,कार्यक्रम अंतर्गत कामांना वार्षिक नियोजन आराखडयात समाविष्ट करावे.

ब) महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना अधिनियम (सुधारणा २००६) व केंद्र शासनाच्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार मजुरांना जॉबकार्ड ठेवणे बंधनकारक राहील. त्यावर तसेच संबंधित कागदपत्रावर मजुरांच्या कामाची नोंद ठेवणे तसेच त्यानुषंगाने इतर आवश्यक रेकॉर्ड तसेच नोंदवहया ठेवणे बंधनकारक राहील.

क) मजुरांना त्यांच्या कामाची मजुरी १५ दिवसात अदा करणे नियमाने बंधनकारक राहील.

ड) कंत्राटद्वारे कामास बंदी राहील.

इ) पारदर्शकता, सामाजिक अंकेक्षण इत्यादी नियमानुसार आवश्यक राहील.

(४) सदर वनीकरण हे गावाच्या ग्रामपंचायत, गावठाण, शासकिय, निमशासकिय, सामुहिक तसेच शैक्षणिक संस्थांच्या जमीनीवर करावे. खाजगी जमिनीवर करण्यात येऊ नये. प्रामुख्याने ग्रामपंचायतीच्या ताब्यात अथवा नियंत्रणाखालील जमीनीवर करावे. वनीकरणाद्वारे तयार होणा-या मालमत्तेवर ग्रामपंचायतीचा अधिकार राहील तसेच त्याची नोंद मग्रारोहयोच्या कामाच्या मालमत्ता नोंदवहीत घेण्यात यावी.

(५) ग्रामपंचायतीने दर्जेदार, उंच व सुदृढ, अठरा महिने वयोमानाची निवडक रोपे सामाजिक वनीकरणाच्या रोपवाटिकेतून किंवा ज्या रोपवाटिकेच्या रोपांचे (किसान रोपवाटिका) दर शासनाने मंजूर केलेले आहेत अशा रोपवाटिकेतून खरेदी करावेत.

(६) ग्रामपंचायत मधील वनीकरण कार्यक्रमाचा खर्च पुढील दोन भागांवर करण्यात यावा.:-

अ) <u>मजुरांच्या मजुरीवरील खर्च -</u>

मजुरांची मजुरी हजेरीपटाच्या आधारे व प्रत्यक्ष केलेल्या कामानुसार अदा करण्यात यावी.
मजुरांना मजुरी अदा केलेले स्वाक्षरीत हजेरीपत्रक योग्य प्रकारे जतन करुन ठेवावे.
मजुरांची मजुरी एकूण अंदाजपत्रकीय रकमेच्या कमीत कमी ६०% असावी.

घ) <u>साधनसामग्रीवरील खर्च -</u>

मजुरांच्या मजुरी व्यतिरिक्त वनीकरण कार्यक्रमासाठी करण्यात येणारे इतर सर्व खर्च साधन सामुग्रीवरीलखर्च म्हणून धरण्यात यावा. महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत खरेदी केलेल्या सर्व साहित्यावरील खर्च उदा. पॉलिथीन बॅग, खत, रोपवाटिकेच्या जागेचे भाडे, कुशल, अर्धकुशल मजुरांची मजुरी, सामुग्रीची ने-आण इत्यादी बाबींवर करण्यात आलेला खर्च सामुग्रीचा खर्च म्हणून समजावा. सदर खर्च संपूर्ण कार्यक्रम खर्चाच्या ४०% पेक्षा जास्त नसावा.

(७) ग्रामपंचायत दोन प्रकारे वनीकरणाचा कार्यक्रम राबवू शकते.

१) ग्रामपंचायत, गावठाण, शाळेचे प्रांगण, मंदिर परिसर, बाजार परिसर, विहिरीच जवळ, स्मशानभूमी परिसर,शासकिय/निमशासकिय कार्यालयाजवळ, सामुहिक व शैक्षणिक संस्थांच्या जमिनीवर व ग्रामपंचायत हद्दीतील इतर उपलब्ध जागेत विखुरलेल्या स्वरुपात वृक्ष लागवड करु शकते.

२) ग्रामपंचायतीच्या हद्दीतील तुटक/विखुरलेली जमीन.

(८) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत गावठाण, शाळेचे प्रांगण, मंदिर परिसर बाजार परिसर, विहिरीचे जवळ, स्मशानभूमी परीसर, कार्यालयाजवळ व ग्रामपंचायत हद्दीतील इतर उपलब्ध जागेत विखुरलेल्या स्वरुपात उंच रोपांच्या लागवडीची तांत्रिक व आर्थिक मापदंड या शासन निर्णयाद्वारे निश्चित करण्यात येत आहेत.

(९) तांत्रिक मान्यता - सद्यस्थितीत वृक्ष लागवडींच्या तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार तालुका स्तरावर सामाजिक वनीकरण विभागाच्या लागवड अधिका-यांना देण्यात आलेले आहेत. सदर योजना राबविण्यास लागवड अधिका-यांची कमी संख्या लक्षात घेता तेच अधिकार पंचायत समितीच्या कृषि अधिकारी यांना देखील हा कार्यक्रम राबविण्याकरीता देण्यात येत आहेत. या करिता कृषि अधिकारी यांना योग्य ते प्रशिक्षण सामाजिक वनीकरण विभागाने द्यावे.

(१०) <u>सामाजिक वनीकरण व ग्राम विकास विभागाचीजबाबदारी/भुमिका -</u>

अ) या कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी रोपवाटिका व वनीकरणबाबतच्या तांत्रिक बाबी जसे अंदाजपत्रके तयार करणे, दर्जेदार रोपांची निवड करणे, रोप लागवड व नंतरचे संबंधित काम इत्यादी बाबतचे मार्गदर्शन व प्रशिक्षण देण्याची जबाबदारी सामाजिक वनीकरण विभाग यांची राहील. त्याचप्रमाणे शासन सुचनेनुसार वेळोवेळी विशिष्ठ बाबींकरिता कामाचा दर्जा व गुणवत्तेबद्दल तपासणी करण्याचे अधिकार सामाजिक वनीकरण विभागाला राहतील. सामाजिक वनीकरण विभागाने या कार्यक्रमाचे तांत्रिक बाबींचे संदर्भात आवश्यक मार्गदर्शन पुस्तिकेद्वारे/ सीडीद्वारे/ व्हिडीओद्वारे प्रसिध्द करावे.

ब) ग्रामपंचायत, पंचायत समिती या यंत्रणा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे अधिपत्याखाली येतात. ग्रामपंचायतीमार्फत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनें अंतर्गत वृक्ष लागवडीचा कार्यक्रम राबवितांना मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सर्वात महत्वाची भुमिका व जबाबदारी राहणार आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांनी आपले अधिनस्त गट विकास अधिकारी यांना हा कार्यक्रम राबविण्याबाबत आदेश/सूचना द्याव्यात व मार्गदर्शन करावे. गट विकास अधिकारी यांनी तालुका स्तरावर गावनिहाय पाच वर्षाचा आराखडा तयार करावा तसेच हा कार्यक्रम यशस्वीपणे राबविण्यासाठी पंचायत समिती सदस्य, सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ व ग्रामसेवक यांचे प्रबोधन करुन त्यांना उद्युक्त करावे. तसेच वरील (अ) मध्ये नमूद केल्याप्रमाणे सामाजिक वनीकरण विभाग यांचेमार्फत याबाबतच्या प्रशिक्षणाचे आयोजन करावे. कार्यक्रमाची अंमलबजावणी ग्रामपंचायतमार्फत होणार असल्याने त्याची सर्वस्वी जबाबदारी सरपंच, ग्रामसेवक व गटविकास अधिकारी यांची राहील.

(११) वृक्ष लागवड संबंधित कामे ही शेती प्रमाणे विशिष्ठ मोसमात करणे आवश्यक आहे. दर्जेदार, उंच व सुदृढ निवडक रोपांची निवड करण्यात यावी. रोपांची वाढ चांगल्या प्रकारे होण्यासाठी रोपांची लागवड तसेच नंतरची कामे योग्यवेळी व योग्य पध्दतीने करुन त्याचे संरक्षण करणे आवश्यक आहे. जिल्हा कार्यक्रम अधिकारी (जिल्हाधिकारी), सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक (मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद), प्रोग्रॅम

अधिकारी (तहसिलदार), सह प्रोग्रॅम अधिकारी (गट विकास अधिकारी) व उपसंचालक, सामाजिक वनीकरण यांनी हा महत्वाचा कार्यक्रम राज्यात चांगल्याप्रकारे राबविण्यासाठी आपले स्तरावर एकत्रितपणे आवश्यक ती कार्यवाही करावी.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in. या संकेत स्थळावर उपलब्धकरण्यातआला असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. 201102231427530012हा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सुधीर ठाकरे)
सचिव, ग्रामविकास.

(व्ही.गिरीराज)
प्रधान सचिव (रोहयो)

प्रति,

मा. राज्यपाल यांचे खाजगी सचिव.
मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
सर्व मंत्री, राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन.
सर्व अतिरिक्त मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालयीन विभाग, मुंबई
सर्व विभागीय आयुक्त.
आयुक्त (कृषि),महाराष्ट्र राज्य, पुणे.
मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), पुणे.
प्रधान मुख्य वन संरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर
संचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य,पुणे
संचालक, भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.
उप सचिव (रोहयो समिती), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
सर्व जिल्हाधिकारी (बृहन्मुंबई वगळून)
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद.
सर्व अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर),
संचालक, अर्थ व सांखिकी संचालनालय, मुंबई.
महासंचालक, अर्थ व सांखिकी संचालनालय, मुंबई.
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई. (प्रसिध्दी करीता),
विभागीय कृषि सहसंचालक,ठाणे,पुणे,कोल्हापूर,नाशिक,औरंगाबाद,अमरावती,नागपूर, लातूर.
सर्व अधीक्षक कृषि अधिकारी,
सर्व सहसंचालक, सामाजिक वनीकरण वृत्ते, नागपूर/अमरावती/औरंगाबाद/नाशिक/पुणे/ कोंकण वृत्त ठाणे.
सर्व मुख्य वन संरक्षक/सर्व उप वनसंरक्षक.
सर्व विभागीय वन संरक्षक/सर्व विभागीय मृदसंधारण अधिकारी.
सर्व उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग,
सर्व प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,
महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र-१ व २, मुंबई व नागपूर,
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ व २, मुंबई व नागपूर,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व कार्यासन अधिकारी, रोहयो प्रभाग व जलसंधारण विभाग.
निवडनस्ती / सारांश रोहयो-१

## परिशिष्ट - अ

विखुरलेल्या स्वरुपात स्वतंत्र वृक्षलागवड - खड्डे - ०.६० X ०.६० X ०.६० मी. आकारमानाचे.
दोन रोपांतील अंतर कमीत कमी ४ मीटर असावे.

गावठाण, शाळेचे प्रांगण, मंदिर परिसर, बाजार परिसर, विहिरीचे जवळ, कार्यालय, स्मशान परिसर व ग्रामपंचायत हद्दीतील इतर उपलब्ध जागा, इत्यादी ठिकाणी जास्तीत जास्त १०० उंच रोपांची ( अठरा महिने वयोमानाची ) लागवड करणे.

दैनंदिन मजुरीचा दर रु १०५/-

| अक्र | तपशील | मनुष्य दिन | मजुरी | सामुग्री | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| अ | **लागवड पूर्व कामे** | | | | |
| १ | सर्वेक्षण व सिमांकन ०.०३ मदिन प्रति ५० खड्डे | ०.०६ | ६.३० | ०.०० | ६.३० |
| २ | खड्डे आखणी करणे १०० खड्डे - ०.१३ मदिन प्रति ५० खड्डेसा.पु. रु. २.२४ प्रति ५० खड्डे | ०.२६ | २७.३० | ४.४८ | ३१.७८ |
| ३ | खड्डे खोदणे आकार ०.६०x०.६०x०.६० मी एकूण खड्डे १००- ७.६८ म.दिन प्रति ५० खड्डे | १५.३६ | १६१२.८० | ०.०० | १६१२.८० |
| | एकूण | १५.६८ | १६४६.४० | ४.४८ | १६५०.८८ |
| | मजुर कल्याण खर्च २.७० % | | | | ४४.५७ |
| | आकस्मिक खर्च २ % | | | | ३३.०२ |
| | एकंदर एकूण | १५.६८ | १६४६.४० | ४.४८ | १७२८.४७ |
| ब | **प्रथम वर्ष कामे** | | | | |
| ४ | ०.६० X ०.६० X०.६० मीआकाराचे १०० खड्डे समोवतालच्या चांगल्या मातीने भरणे. भरतेवेळी खड्ड्यात सिंगल सुपर फॉस्फेटलिंडेन बुरशीनाशके, किटकनाशके, कंपोस्ट / शेणखत प्रत्येक खड्ड्यात टाकणे२.५ म.दिन प्रमाणे प्रति ५० खड्ड्यांसाठी | ५.०० | ५२५.०० | २००.०० | ७२५.०० |
| ५ | अठरा महिने वयोमानाची निवडक रोपे खरेदी करणे ११० उंच रोपे त्यापैकी ७०% रोपे शोभिवंत व सावली देणाऱ्या प्रजाती व ३० % रोपे फळझाडे तसेच निवडक व धार्मिक महत्व असलेले वृक्ष याप्रमाणे प्रति रोप रु.५०/- | ०.०० | ०.०० | ५५००.०० | ५५००.०० |
| ६ | रोपवाटिकेपासून रोपवन क्षेत्रापर्यंत ११० रोपांची भरणीवाहतूक व रोपे लागवडीच्या जागेवर ठिकठिकाणी उतरवून ठेवणे मदिन ५५ रोपांना व सा.पु.रु. ३००/- प्रति ५५ रोपांसाठी | २.०० | २१०.०० | ६००.०० | ८१०.०० |
| ७ | १०० रोपांची लागवड करणे मदिन ५० रोपांसाठी | ४.०२ | ४२२.१० | ०.०० | ४२२.१० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ८ | मरअळीच्या ठिकाणी १० टक्के (१० रोपे रोपांची खड्ड्यांमध्ये लागवड करणे मदिन प्रति ५ रोपांना | ०.४० | ४२.०० | ०.०० | ४२.०० |
| ९ | रोपांसभोवती काटेरी फांद्यांचे कुंपण करणे व आवश्यकतेनुसार त्याची दुरुस्ती करणे १३.२९ म.दिन ५० रोपांसाठी | २६.७८ | २८११.९० | ७०३.०० | ३५१४.९० |
| १० | १०० रोपांना निंदणी व माती सैल करुन आळे करणे.३ वेळा आणि पाणी देण्यासाठी आळी करुन माती सैल करणे ३.४० म.दिन प्रति ५० खड्ड्यांसाठी व आवश्यकतेनुसार खते देणे | ६.८० | ७१४.०० | ४५.०० | ७५९.०० |
| ११ | संरक्षण व देखभाल व संगोपन - | २४.२८ | २५४९.४० | ०.०० | २५४९.४० |
| १२ | गरजेनुसार १०० रोपांना प्रति रोप २० लिटर प्रमाणे ४ वेळा पाणी देणे ( ५० रोपांना ६ वेळा पाणी देणेसाठी ३.७ म.दि त्यात रु. ३१८/- बैलगाडी, भाडेगाडीवान व बैलजोडी यांचेवर खर्च रोहयो बाब क्र (शा. नि. दि. ०९/११/२००९) व १ मजूर पाणी देणेसाठी असे एकूण रु. ४२३/- प्र.म.दिन ऑक्टोबर/जानेवारी / फेब्रुवारी / मार्च | ४.९४ | २०८९.६२ | ०.०० | २०८९.६२ |
| | एकुण | ७४.२२ | ९३६४.०२ | ७०४८.०० | १६४१२.०२ |
| | मजुर कल्याण खर्च २.७० % | | | | ४४३.१२ |
| | आकस्मिक खर्च २ % | | | | ३२८.२४ |
| | एकंदर एकुण | ७४.२२ | ९३६४.०२ | ७०४८.०० | १७१८३.३८ |
| क्र | द्वितीय वर्ष कामे | | | | |
| १३ | १०० रोपांना निंदणी व माती सैल करुन आळे करणे. ३ वेळा आणि पाणी देण्यासाठी आळी करुन माती सैल करणे ३.४० म. दिन प्रति ५० खड्ड्यांसाठी व आवश्यकतेनुसार खते देणे | ६.८० | ७१४.०० | ४५.०० | ७५९.०० |
| १४ | संरक्षण व देखभाल व संगोपन - द्वितीय वर्ष - एप्रिल ते मार्च | २९.४२ | ३०८९.१० | ०.०० | ३०८९.१० |
| १५ | गरजेनुसार १०० रोपांना प्रति रोप २० लिटर प्रमाणे ५ वेळा पाणी देणे ( ५० रोपांना ६ वेळा पाणी देणेसाठी ३.७ म.दि त्यात रु. ३१८/- बैलगाडी, भाडेगाडीवान व बैलजोडी यांचेवर खर्च रोहयो बाब क्र. (शा.नि.दि.०९/११/२००९) व १ मजूर पाणी देणेसाठी असे एकूण रु. ४२३/- प्र.म.दिन एप्रिल२ वेळा, मे २ वेळा व ऑक्टोबर १वेळा | ६.२६ | २६०५.६८ | ०.०० | २६०५.६८ |
| | एकुण | ४२.३८ | ६४०८.७८ | ४५.०० | ६४५३.७८ |
| | मजुर कल्याण खर्च २.७० % | | | | १७४.२५ |
| | आकस्मिक खर्च २ % | | | | १२९.०८ |
| | एकंदर एकुण | ४२.३८ | ६४०८.७८ | ४५.०० | ६७५७.११ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ड | तृतीय वर्ष कामे | | | | |
| १६ | १०० रोपांना निंदणी व माती सैल करुन आळे करणे ३ वेळा आणि पाणी देण्यासाठी आळी करुन माती सैल करणे ३.४० म. दिन प्रति ५० खड्ड्यांसाठी व आवश्यकतेनुसार खते देणे. | ६.८० | ७१४.०० | ४५.०० | ७५९.०० |
| १७ | संरक्षण व देखभाल व संगोपन - तृतीय वर्ष - एप्रिल ते मार्च | २९.४२ | ३०८९.१० | ०.०० | ३०८९.१० |
| १८ | गरजेनुसार १०० रोपांना प्रति रोप २० लिटर प्रमाणे २ वेळा पाणी देणे ( ५० रोपांना ६ वेळा पाणी देणेसाठी ३.७ म. दि. त्यात रु.३१८/- बैलगाडी, भाडेगाडीवान व बैलजोडी यांचेवर खर्च रोहयो बाब क्र. (शा.नि.दि. ०९/११/२००९) व १ मजूर पाणी देणेसाठी असे एकुण रु. ४२३/- प्र.म.दिन एप्रिल १ वेळा, मे १ वेळा | २.४६ | १०४०.५८ | ०.०० | १०४०.५८ |
| | एकूण | ३८.६८ | ४८४३.६८ | ४५.०० | ४८८८.६८ |
| | मजुर कल्याण खर्च २.७० % | | | | १३१.९९ |
| | आकस्मिक खर्च २ % | | | | ९७.७७ |
| | एकंदर एकूण | ३८.६८ | ४८४३.६८ | ४५.०० | ५११८.४५ |

## गोषवारा

| अक्र | तपशील | म.दिन | मजुरी | साहित्य | इतर खर्च | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | लागवड पूर्व कामे | १५.६८ | १६४६.४० | ४.४८ | ७७.५९ | १७२८.४७ |
| २ | प्रथम वर्ष कामे | ७४.२२ | ९३६४.०२ | ७०४८.०० | ७७१.३६ | १७१८३.३८ |
| ३ | द्वितीय वर्ष कामे | ४२.३८ | ६४०८.७८ | ४५.०० | ३०३.३३ | ६७५७.११ |
| ४ | तृतीय वर्ष कामे | ३८.६८ | ४८४३.६८ | ४५.०० | २२९.७७ | ५११८.४५ |
| | एकंदर एकूण | १७०.९६ | २२२६२.८८ | ७१४२.४८ | १३८२.०५ | ३०७८७.४१ |

प्रति रोप खर्च रु३०७/-

----------